**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर**
**विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

**Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,**
**Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur-416 004**

**Phones:** Chairman 2690829 [O] 2656044 [R] Secrtary 2691405[O] 2324079 [R].
**PBX** – 2696101, 2696102, 2696103 **FAX:** [0231] 2690758
**E-Mail:** divsec.kop@gmail.com **Website :** sscboardkolhapur.in

क्र. कोविमं/माध्य.परीक्षा/ 337
कोल्हापूर - ४१६ ००४
दिनांक - ०१/०६/२०२१

प्रति,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त
शाळेचे मुख्याध्यापक,
( सातारा /सांगली /कोल्हापूर )

**विषय**:-शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी ) साठी मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत

सदंर्भ:-१.शासन निर्णय क्रमांक-परीक्षा ०५२१/प्र.क्र.३९/एसडी-२,दि.१२ मे २०२१
२.शासन निर्णय क्रमांक-परीक्षा ०५२१/प्र.क्र.४३/एसडी-२,दि.२८ मे २०२१
३.राज्य मंडळ,पुणे जा.क्र.रा.मं./परीक्षा-२/३२४४, दि.३१/०५/२०२१ पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकित शासन निर्णयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन २०२१ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात आलेली माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कोविड-१९ चा प्रादुर्भाव राज्यात मोठया प्रमाणात वाढत गेल्याने उद्‌भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे **शासन निर्णय क्रमांक-परीक्षा ०५२१/प्र.क्र.३९/एसडी-२,दि.१२ मे २०२१** नुसार रद्द करण्यात आलेली आहे. सदर परीक्षा रद्द केल्यामुळे, इयत्ता १० वीच्या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या निकालासाठी मूल्यमापन कार्यपध्दती संदर्भ क्र.०२ च्या शासन निर्णयानुसार जाहीर करण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णयानुसार जाहीर करण्यात आलेली मूल्यमापन कार्यपध्दती आपल्या शाळेतील शिक्षक,विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

( देविदास कुलाळ)
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर**

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) साठी मूल्यमापन कार्यपध्दती जाहीर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्र. परीक्षा ०५२१/ प्र.क्र.४३/ एसडी- २**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई - ३२
दिनांक : २८ मे, २०२१

**संदर्भ :**

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. अभ्यास -२११६/(प्र.क.४३/१६)/एस.डी -४ दिनांक २५ एप्रिल, २०१६
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९/प्र.क.(२४३/१९)/एसडी -४ दिनांक ०८ ऑगस्ट,२०१९
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. परीक्षा ०५२१/प्र.क.३९/एस.डी-२ दिनांक १२ मे,२०२१
४. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचा प्रस्ताव क्र. राशैसंप्रप/ मूल्यमापन/इ.१० वी मूल्यमापन प्रस्ताव /२०२१/१५९१ दिनांक १८ मे, २०२१

**प्रस्तावना -**

कोविड -१९ प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये दिनांक १५ जून २०२० पासून प्रत्यक्ष वर्ग भरू शकत नसल्याने राज्यातील शाळांमधून विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अध्यापन सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला. यानुसार शैक्षणिक वर्ष सुरु करण्यात आले, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र तर्फे पर्यायी शैक्षणिक दिनदर्शिका, दीक्षा अभ्यासमाला, यु ट्यूब चॅनेल, ऑनलाईन अध्यापन वर्ग, इ. मार्फत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विविध पर्याय उपलब्ध करून देण्यात आले. कोविड -१९ चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता शासनाने लागू केलेले लॉकडाऊन / संचारबंदी निर्बंध कालावधी वेळोवेळी वाढविण्यात आला. शासनाने लॉकडाऊन / संचारबंदीच्या निर्बंधामध्ये शिथिलता दिल्यानंतर स्थानिक परिस्थितीनुसार इयत्ता ९ वी ते १२ वी च्या राज्यातील शाळा विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह दिनांक २३ नोव्हेंबर २०२० पासून टप्प्याटप्याने सुरू करण्यात आल्या.

राज्यातील महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे मार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा सन २०२१ च्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले. यानुसार इ. १० वी ची परीक्षा दि.२९ एप्रिल २०२१ पासून सुरु होणार होती. कोविड-१९ चा प्रार्दुभाव वाढत गेल्यामुळे इ. १० वीची परीक्षा घ्यावी किंवा कसे याबाबत शिक्षण संस्थांचे संस्थाचालक, शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षण क्षेत्रातील कार्यरत व्यक्ती यांच्याशी व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे विचार विनिमय करण्यात आली. कोविड -१९ चा पुन्हा वाढलेला प्रादुर्भाव विचारात घेता सदर परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि कोविड -१९ चा प्रादुर्भाव मार्च २०२१ पासून राज्यात मोठ्या प्रमाणात वाढत गेल्याने उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे इ.१० वीच्या परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे तसेच परीक्षेसंदर्भातील सर्व घटकांचे हित लक्षात घेऊन मा. मंत्रीमंडळाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

"सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत आयोजित करण्यात येणारी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) रद्द करण्यात यावी. तसेच इ. १० वीच्या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना सरसकट इ. ११ वी मध्ये प्रवेश देण्यात यावा."

मा.मंत्रीमंडळाने घेतलेल्या प्रस्तुत निर्णयाच्या अनुषंगाने, इ. १० वीची परीक्षा रद्द करण्याबाबत दि.१२ मे २०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. परीक्षा रद्द केल्यामुळे गुणपत्रक/ प्रमाणपत्र देण्याबाबत स्वतंत्रपणे निर्देश निर्गमित करण्यात येतील असे स्पष्ट करण्यात आले. त्यानुसार इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांचा निकाल मंडळामार्फत जाहीर करून गुणपत्रक व प्रमाणपत्र देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

राज्यातील विविध शैक्षणिक कार्ये व राज्यस्तरीय संस्थांच्या कार्यामध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने संदर्भ क्र. १ येथील दि. २५ एप्रिल २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे शालेय अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, मूल्यमापन, इत्यादी कामांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. राज्यस्तरीय संस्थांच्या कार्यामध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने समन्वयाची जबाबदारी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद हे सदर समितीचे सचिव असून सदर समितीमध्ये अध्यक्ष, राज्य मंडळ पुणे, संचालक (माध्यमिक), संचालक(प्राथमिक), संचालक (बालभारती) हे सदस्य आहेत.

राज्यात कोविड- १९ मुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी इ. १० वीची परीक्षा रद्द केल्यामुळे, इयत्ता १० वीच्या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कशाप्रकारे करण्यात यावे, याबाबत शिक्षण विभागाच्या अखत्यारितील विविध संस्थांच्या प्रमुखांसोबत, शिक्षण क्षेत्रातील काही अनुभवी व्यक्तींसोबत चर्चा करण्यात आली. यामध्ये इ. १० वीच्या परीक्षेसंदर्भात व विद्यार्थ्यांच्या मुल्यमापनाबाबत विविध पर्यायांचा विचार करण्यात आला. याबाबत सर्वकष विचारविनिमय करण्यात येऊन आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील समन्वय समितीच्या बैठकीत विविध पर्यायांमुळे होणारे परिणाम व करावयाची कार्यवाही याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. उपलब्ध सर्व पर्यायांचा विचार करण्यात येऊन सद्य:स्थितीत मूल्यमापन योजनेचा सर्वात योग्य पर्याय निश्चित करण्यात आला व त्यानुसार प्रस्ताव शासनास सादर करण्याचा निर्णय समन्वय समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आला. या अनुषंगाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने संदर्भ क्र. ४ येथील दिनांक १८ मे २०२१ च्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) साठी मूल्यमापन कार्यपध्दतीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

**शासन निर्णय -**

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेची फलनिष्पती तपासण्यासाठी व विद्यार्थ्यांची संपादन पातळी निश्चित करण्यासाठी मूल्यमापन प्रक्रिया महत्वपूर्ण आहे. कोविड -१९ च्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर राज्य मंडळामार्फत आयोजित करण्यात येणारी शैक्षणिक वर्ष २०२०- २१ मधील इयत्ता दहावीची लेखी परीक्षा रद्द करण्यात आली असली तरी वर्षभर शाळांमध्ये शिक्षकांनी ऑनलाइन, ऑफलाईन अध्यापन करत असताना

व्हाट्सअप बेस्ड मूल्यमापन, कृतीपुस्तिका, गृहकार्य, स्वाध्याय, सराव चाचण्या, प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा इत्यादी विविध मार्गांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन / ऑफलाईन मूल्यमापन केलेले आहे.

इयत्ता ९ वी - १० वी साठी सुधारित मूल्यमापन योजना शासन निर्णय दिनांक ०८ ऑगस्ट २०१९ नुसार सन २०१९-२० पासून लागू करण्यात आली आहे. सदर मूल्यमापन योजनेनुसार विद्यार्थ्यांचे प्रत्येक विषयासाठी १०० गुणांचे मूल्यमापन करण्यात येते. यामध्ये इ. १० वी साठी प्रत्येक विषयाची ८० गुणांची लेखी परीक्षा व २० गुणांची तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा / अंतर्गत मूल्यमापन परीक्षा मंडळामार्फत घेण्यात येते. मंडळामार्फत घेण्यात येणारी परीक्षा रद्द केल्यामुळे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी दि.१८ मे २०२१ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील इ. १० वी च्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इयत्ता ९ वीचे विषयनिहाय सराव चाचण्या, प्रथम सत्र परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन यांच्या आधारे संपादणूकीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून वार्षिक निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. इयत्ता ९ वी चे मूल्यमापन हे सन २०१९-२० मध्ये कोविड-१९ च्या परिस्थितीपूर्वी करण्यात आलेले आहे व विद्यार्थ्यांचे संपादणूकीचे विश्वासार्ह अभिलेख 'सरल' प्रणालीवर देखील उपलब्ध आहेत. याचा विचार करून इ. ९ वी अंतिम मूल्यमापन व इ.१० वी वर्षभरातील शाळांतर्गत विविध मूल्यमापन साधनांद्वारे करण्यात आलेल्या मूल्यमापनाच्या आधारे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा सन २०२१ चा निकाल जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. ही अपवादात्मक परिस्थितीतील सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठीची तात्पुरती व्यवस्था आहे.

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र ( इ.१० वी ) परीक्षेचा निकाल तयार करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.**

### अ) नियमित विद्यार्थ्यांसाठी कार्यपद्धती

इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी या दोन्ही इयत्तांसाठी विषयनिहाय मूल्यमापन योजना ही समान असून याच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इयत्ता ९ वीचे विषयनिहाय सराव चाचण्या, प्रथम सत्र परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन यांच्या आधारे संपादणूकीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून वार्षिक निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. कोविड -१९ च्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक वर्ष २०२०- २१ मध्ये राज्यातील विविध भागातील शाळा या स्थानिक परिस्थितीमुळे एकाचवेळी सुरू होऊ शकल्या नाहीत. तसेच राज्यातील सर्वच शाळांमध्ये इ.१० वी च्या मूल्यमापन प्रक्रियेतील सराव चाचण्या, प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा यांपैकी सर्वच परीक्षा घेण्यात आल्या आहेतच असे नाही.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता वस्तुनिष्ठ मूल्यमापन होण्याच्या दृष्टीने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा सन २०२१ चा निकाल तयार करताना विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील इयत्ता ९ वी ची अंतिम संपादणूक आणि इ.१० वी मध्ये वर्षभरातील शाळांतर्गत केलेले मूल्यमापनाच्या आधारे प्राप्त संपादणूक यांचा खालीलप्रमाणे एकत्रित विचार करण्यात यावा.

| अ .क्र. | मूल्यमापनाचा तपशिल | गुण |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्याच्या इ.९ वीचा विषयनिहाय अंतिम निकाल | ५० गुण |
| २. | विद्यार्थ्याच्या इ.१० वीच्या वर्षभरातील अंतर्गत लेखी मूल्यमापन | ३० गुण |
| ३. | विद्यार्थ्याचे इ.१० वी चे अंतिम तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन | २० गुण |
| ४. | एकूण गुण | १०० गुण |

**१. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील इ.९ वीच्या अंतिम निकालातील विषयनिहाय १०० पैकी गुणांचे इ.१० वी साठी विषयनिहाय ५० पैकी गुणात रूपांतर करणे.**

i. मंडळामार्फत शाळांना गुण भरण्याची संगणकीय प्रणाली उपलब्ध करून देण्यात येईल. त्यामध्ये इ. १० वी परीक्षेसाठी प्रविष्ट असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचे इ.९ वीच्या अंतिम निकालाचे विषयनिहाय १०० पैकी प्रत्यक्ष प्राप्त गुण भरण्याची सुविधा असेल. यामध्ये शाळांनी गुण भरल्यानंतर सदर गुणांचे विषयनिहाय ५० गुणांत संगणकीय प्रणालीव्दारे रूपांतर करण्यात येईल.

ii. सदर गुणांची वस्तुनिष्ठता पडताळण्यासाठी शाळांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील इ.९ वीच्या सरल प्रणालीमध्ये शाळांनी नमूद केलेल्या इ. ९ वी च्या विद्यार्थीनिहाय वार्षिक निकालावरून करण्यात येईल. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इयत्ता ९ वीचे विषयनिहाय सराव चाचण्या, प्रथम सत्र परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन यांच्या आधारे संपादणूकीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून वार्षिक निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत.

**२. विद्यार्थ्यांच्या इ.१० वीच्या प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा यामधील एक वा अधिक लेखी परीक्षांमधील विषयनिहाय ८० पैकी प्राप्त गुणांचे ३० पैकी गुणांत रूपांतर करणे.**

i. विद्यार्थ्याने प्रथम सत्र परीक्षा, सराव (पूर्व) परीक्षा या दोन्ही परीक्षा दिल्या असल्यास सदर दोन परीक्षांपैकी सर्वोत्तम एकूण गुण असलेल्या एका परीक्षेचे विषयनिहाय प्राप्त गुण विचारात घेऊन त्या ८० पैकी प्राप्त गुणांचे ३० पैकी गुणांत रुपांतर करण्यात यावे.

ii. विद्यार्थ्याने प्रथम सत्र परीक्षा, सराव (पूर्व) परीक्षा यामधील एकच परीक्षा दिली असल्यास त्या परीक्षेतील विषयनिहाय ८० गुणांपैकी प्राप्त झालेल्या गुणांचे ३० पैकी गुणांत रुपांतर करावे.

iii. अपवादात्मक परिस्थितीत ज्या माध्यमिक शाळांमध्ये प्रथम सत्र व सराव परीक्षा या परीक्षांचे आयोजन करणे शक्य झाले नाही अशा शाळांनी वर्षभरात इ.१० वीच्या अभ्यासक्रमावर आयोजित केलेल्या सराव चाचण्या, स्वाध्याय, गृहकार्य, प्रकल्प यापैकी एक किंवा अधिक कार्याला विद्यार्थ्यास विषयनिहाय प्राप्त झालेल्या एकूण गुणांचे ३० पैकी गुणात रुपांतर करावे.

( विषयनिहाय ३० गुणांपेक्षा जास्त अथवा कमी गुणांचे मूल्यमापन केले असल्यास त्याचे ३० पैकी गुणांत रुपांतर करावे.)

iv. ज्या शाळांमध्ये वरील प्रमाणे मूल्यमापन करणे शक्य झाले नाही त्यांनी सराव चाचण्या, स्वाध्याय, गृहकार्य, प्रकल्प इत्यादी पैकी एक किंवा अधिक बाबींची पूर्तता करून घेऊन त्या आधारे विद्यार्थ्यास विषयनिहाय प्राप्त झालेल्या एकूण गुणांचे ३० पैकी गुणात रुपांतर करावे.

v. उपरोक्तप्रमाणे अंतिम केलेले विद्यार्थीनिहाय व विषयनिहाय ३० पैकी गुण मंडळाच्या संगणक प्रणालीत भरण्यात यावेत.

**३. मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार विद्यार्थ्यास इ.१० वीच्या अंतिम तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन यामध्ये प्रत्यक्ष प्राप्त झालेले २० पैकी गुण अंतिम निकालात समाविष्ठ करणे.**

i. ज्या माध्यमिक शाळांनी विषयनिहाय मंजूर आराखडयानुसार तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा , अंतर्गत मूल्यमापन केलेले आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यास विषयनिहाय प्रत्यक्ष प्राप्त झालेले २० पैकी गुण संगणकीय प्रणालीत भरण्यात यावेत.

ii. अपवादात्मक परीस्थितीत ज्या माध्यमिक शाळांमध्ये तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन करण्यात आले नसेल ते शाळांनी मंडळाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार पूर्ण करावे.

iii. याशिवाय श्रेणी विषयांसाठी विद्यार्थ्यांना प्राप्त झालेल्या श्रेणी संगणक प्रणालीमध्ये नमूद करावी.

**४. उपरोक्त कार्यप्रणालीनुसार अंतिम करण्यात आलेल्या निकालाने समाधान न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी कोविड -१९ ची परिस्थिती सर्वसामान्य झाल्यानंतर राज्य मंडळामार्फत प्रचलित पध्दतीनुसार आयोजित केल्या जाणाऱ्या श्रेणीसुधार योजनेअंतर्गत यापुढील लगतच्या दोन परीक्षांमध्ये प्रविष्ठ होण्याची संधी उपलब्ध असेल. माध्यमिक/ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा श्रेणीसुधार योजनेचे (Class Improvement Scheme) सर्व नियम या विद्यार्थ्यांना लागू असतील.**

**ब) पुनर्परीक्षार्थ्यांसाठी कार्यपद्धती**

| अ .क्र. | मूल्यमापनाचा तपशिल | गुण |
|---|---|---|
| १. | राज्य मंडळाच्या यापूर्वीच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विषयांमध्ये लेखी परीक्षेत प्राप्त गुणांची सरासरी | ८० गुण |
| २. | विद्यार्थ्याचे इ.१० वीचे अंतिम तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन | २० गुण |
| ३. | एकूण गुण | १०० गुण |

१. राज्य मंडळाच्या यापूर्वीच्या परीक्षेत एक वा अधिक विषयांत अनुतीर्ण झाल्यामुळे पुनर्परीक्षार्थी म्हणून प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्याने मंडळाच्या यापूर्वीच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या लेखी परीक्षेतील ८० पैकी प्राप्त गुणांच्या सरासरी एवढे गुण प्रविष्ट झालेल्या विषयाच्या लेखी परीक्षेसाठी संगणक प्रणालीमार्फत देण्यात येतील.

ज्या वर्षामध्ये १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात आली आहे त्या वर्षीच्या उत्तीर्ण विषयांबाबत १०० गुणांचे ८० गुणात रुपांतर करून, सरासरी एवढे गुण प्रविष्ट झालेल्या विषयांच्या लेखी परीक्षेसाठी संगणक प्रणालीमार्फत देण्यात येतील.

माध्यमिक शाळांनी अशा विद्यार्थ्यांचे यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या विषयासमोर संगणक प्रणालीमध्ये परीक्षेचे वर्ष व बैठक क्रमांक अचूक नोंदवावेत.

२. राज्य मंडळाच्या यापूर्वीच्या परीक्षांमध्ये एकाही विषयांत उत्तीर्ण न झालेल्या पुनर्परीक्षार्थ्यांच्या बाबतीत संबंधीत शाळांनी सराव चाचण्या, स्वाध्याय, गृहकार्य, प्रकल्प यापैकी एक किंवा अधिक बाबींची पूर्तता करून त्या आधारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करून विषयनिहाय ८० पैकी गुणदान करावे व ते संगणकीय

प्रणालीमध्ये भरावेत. अशा पुनर्परीक्षार्थ्यांच्या बाबतीत सदर विद्यार्थ्यास इ.९ वीमध्ये प्राप्त झालेल्या एकूण गुणांची टक्केवारी संगणक प्रणालीमध्ये भरण्यात यावी.

३. खाजगी पुनर्परीक्षार्थ्यांच्या बाबतीत सदर विद्यार्थ्यास या पूर्वीच्या अंतिम इयत्तेत (इ.५ वी ते ९ वी) मध्ये प्राप्त झालेल्या एकूण गुणांची टक्केवारी संगणक प्रणालीमध्ये भरण्यात यावी.

४. माध्यमिक शाळांनी विषयनिहाय प्रचलित मूल्यमापन आराखडयानुसार तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन केलेले आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यास विषयनिहाय प्रत्यक्ष प्राप्त झालेले २० पैकी गुण संगणकीय प्रणालीत भरण्यात यावेत.

५. अपवादात्मक परीस्थितीत ज्या माध्यमिक शाळांमध्ये तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन करण्यात आले नसेल ते शाळांनी मंडळाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार पूर्ण करावे.

६. याशिवाय श्रेणी विषयांमध्ये अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना सदर श्रेणी विषयात प्राप्त झालेली श्रेणी संगणक प्रणालीमध्ये नमूद करावी.

**क) खाजगी विद्यार्थ्यांसाठी कार्यपद्धती**

| अ .क्र. | मूल्यमापनाचा तपशिल | गुण |
|---|---|---|
| १. | संपर्क केंद्रामार्फत आयोजित सराव चाचण्या, पूर्ण केलेल्या स्वाध्याय पुस्तिका, गृहकार्य, प्रकल्प यापैकी एक वा अधिक बाबींसाठी प्राप्त झालेल्या गुणांचे विषयनिहाय ८० पैकी गुणात रुपांतर करणे | ८० गुण |
| २. | मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार विद्यार्थ्यास इ.१० वीच्या अंतिम तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन यामध्ये प्रत्यक्ष प्राप्त झालेले २० पैकी गुण | २० गुण |
| ३. | एकूण गुण | १०० गुण |

१. संपर्क केंद्रामार्फत संपर्क शिबिरामध्ये अथवा अन्य कालावधीत आयोजित केलेल्या सराव चाचण्या, पूर्ण केलेल्या स्वाध्याय पुस्तिका, गृहकार्य, प्रकल्प यापैकी एक किंवा अधिक बाबींसाठी संपर्क केंद्र स्तरावर विषयनिहाय गुणदान करण्यात यावे. सदर प्राप्त गुणांचे विषयनिहाय ८० पैकी गुणात रुपांतर करावे. ( विषयनिहाय ८० गुणांपेक्षा जास्त अथवा कमी गुणांचे मूल्यमापन केले असल्यास त्याचे ८० पैकी गुणांत रुपांतर करावे.)

२. संपर्क केंद्रांनी विषयनिहाय मंजूर आराखडयानुसार तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन केलेले आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यास विषयनिहाय प्रत्यक्ष प्राप्त झालेले २० पैकी गुण संगणकीय प्रणालीत भरण्यात यावेत.

३. ज्या संपर्क केंद्रांनी तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन केले नसेल त्या संपर्क केंद्रांनी ते मंडळाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार पूर्ण करून घ्यावे.

४. श्रेणी विषयांमध्ये सदर विद्यार्थ्यांना प्राप्त झालेली श्रेणी संगणक प्रणालीमध्ये नमूद करावी.

५. सदर विद्यार्थ्याने यापूर्वी उत्तीर्ण केलेल्या अंतिम परीक्षेमध्ये ( इ.५वी ते इ.९वी यापैकी अंतिम परीक्षा असेल ते ) प्राप्त झालेल्या एकूण गुणांची टक्केवारी/श्रेणी संगणक प्रणालीमध्ये भरण्यात यावी.

**ड) तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे परीक्षार्थी** ( Isolated Candidates )

| अ .क्र. | मूल्यमापनाचा तपशिल | गुण |
|---|---|---|
| १. | मंडळाच्या यापूर्वीच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विषयांच्या लेखी परीक्षेतील प्राप्त गुणांची सरासरी | ८० गुण |
| २. | विद्यार्थ्याचे इ.१० वीचे अंतिम तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन | २० गुण |
| ३. | एकूण गुण | १०० गुण |

१. मंडळाच्या यापूर्वीच्या उत्तीर्ण झालेल्या व वेगळ्या विषयांसाठी तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्याने मंडळाच्या यापूर्वीच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विषयांच्या लेखी परीक्षेतील ८० पैकी प्राप्त गुणांच्या सरासरी एवढे गुण प्रविष्ट झालेल्या विषयाच्या लेखी परीक्षेसाठी देण्यात येतील.

ज्या वर्षामध्ये १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात आली आहे त्या वर्षीच्या उत्तीर्ण विषयांबाबत १०० गुणांचे ८० गुणात रुपांतर करून, सरासरी एवढे गुण प्रविष्ट झालेल्या विषयांच्या लेखी परीक्षेसाठी संगणक प्रणालीमार्फत देण्यात येतील.

माध्यमिक शाळांनी अशा विद्यार्थ्यांचे यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या विषयासमोर संगणक प्रणालीमध्ये परीक्षेचे वर्ष व बैठक क्रमांक अचूक नोंदवावेत.

२. माध्यमिक शाळांनी विषयनिहाय मंजूर आराखडयानुसार तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन केलेले आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यास विषयनिहाय प्रत्यक्ष प्राप्त झालेले २० पैकी गुण संगणकीय प्रणालीत भरण्यात यावेत.

३. ज्या माध्यमिक शाळांमध्ये अशा विद्यार्थ्यांचे तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन करण्यात आले नसेल त्या शाळांनी मंडळाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार पूर्ण करून घ्यावे.

**इ) श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट विद्यार्थी**

श्रेणीसुधार योजनेअंतर्गत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा २०२१ साठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मंडळाच्या प्रचलित पध्दतीनुसार श्रेणीसुधार योजनेअंतर्गत असलेल्या दोन संधींमध्ये उपरोक्त रद्द झालेल्या परीक्षेची गणना करण्यात येणार नाही. त्यामुळे त्याला उर्वरित एक किंवा दोन संधी उपलब्ध असतील.

i. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च २०२० मध्ये सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना नोव्हेंबर - डिसेंबर २०२० मधील परीक्षेत प्रथम संधी उपलब्ध होती. आता यानंतर मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या प्रथम परीक्षेची आणखी एक संधी अशा विद्यार्थ्यांना उपलब्ध असेल.

ii. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा नोव्हेंबर - डिसेंबर २०२० मध्ये सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना एप्रिल - मे २०२१ मधील परीक्षेत प्रथम संधी उपलब्ध होती तथापि सदर परीक्षा रद्द झाल्याने आता यानंतर मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या लगतच्या पुढील दोन परीक्षांच्या संधी अशा विद्यार्थ्यांना उपलब्ध असतील.

iii. वरील ( i ) व ( ii ) विचारात घेता अशा विद्यार्थ्यांचा निकाल तयार करण्यात येणार नाही.

## शाळास्तरावर निकाल समितीची स्थापना

प्रत्येक माध्यमिक शाळा त्यांच्या स्तरावर मुख्याध्यापकासह कमाल ०७ सदस्यांची निकाल समिती गठीत करेल. संबंधित शाळेचे मुख्याध्यापक सदर समितीचे अध्यक्ष राहतील. तसेच विज्ञान, गणित, सामाजिक शास्त्र, भाषा या सर्व विषयांच्या शिक्षकांचा सदस्य म्हणून समावेश असेल. सदस्यांपैकी उपमुख्याध्यापक/ पर्यवेक्षक /सेवाजेष्ठ शिक्षक समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.

i. संबंधित विषय शिक्षक आपल्या विषयांचा वरील कार्यपद्धतीनुसार निकाल तयार करतील व सदर निकाल वर्गशिक्षकाकडे सादर करतील.

ii. वर्गशिक्षक विषय शिक्षकांनी सादर केलेल्या विषयनिहाय गुणांचे व श्रेणीचे संकलन करून आपल्या वर्गाचा निकाल मंडळाने निश्चित केलेल्या विहित नमुन्यात तयार करून, शाळेच्या निकाल समितीकडे सादर करेल.

iii. निकाल समिती वर्गशिक्षकांनी तयार केलेल्या निकालाचे परीक्षण व नियमन करून वरील कार्यपद्धतीनुसार अचूक असल्याची खात्री करून स्वाक्षरीसह दोन प्रतीत प्रमाणित करेल.

iv. निकाल समितीने प्रमाणित केलेले गुण व श्रेणी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी संगणक प्रणालीत नोंदवाव्यात.

v. निकाल समितीने अंतिम केलेल्या निकालपत्रकाची एक मूळ प्रत समिती सदस्यांच्या स्वाक्षरीने शाळेत मुख्याध्यापकाच्या अभिरक्षेत ठेवण्यात येईल.

vi. निकाल समितीने अंतिम केलेल्या निकालपत्रकाची दुसरी मूळ प्रत व इ.९ वीच्या विद्यार्थीनिहाय अंतिम निकालाची समितीने साक्षांकित प्रत सीलबंद पाकिटात विभागीय मंडळाकडे सादर करण्यात यावा.

## अभिलेख जतन करणे

इयत्ता ९ वीच्या वार्षिक मूल्यमापनाचे अभिलेख व इयत्ता १० वीच्या अंतर्गत मूल्यमापनाच्या संदर्भातील सर्व अभिलेख, संबंधित उत्तरपत्रिका व तत्सम बाबी निकाल समितीच्या पडताळणीनंतर सीलबंद करून मुख्याध्यापकांच्या ताब्यात ठेवण्यात याव्यात.

माध्यमिक शाळा संहितेनुसार सदर अभिलेख सुमारे अठरा महिने जतन करून ठेवण्यात यावेत व आवश्यकता भासेल तेव्हा शालेय्र शिक्षण विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना / पथकास पडताळणीसाठी उपलब्ध करून देण्यात यावेत.

## अभिलेखांची पडताळणी

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या संदर्भातील विद्यार्थी मूल्यमापन नोंदपत्रके, आवश्यक अभिलेख व तत्सम बाबी यांची तपासणी/ पडताळणी मंडळाकडून विभागीय मंडळे व शालेय शिक्षण विभागातील क्षेत्रीय अधिकारी / पथकांमार्फत करण्यात येईल. शाळांनी संगणकीय प्रणालीमध्ये

विद्यार्थीनिहाय भरलेल्या गुणांच्या नोंदी व शाळेकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखातील प्रत्यक्ष गुण याची पडताळणी करण्यात येईल.

**कार्यपद्धतीचे उल्लंघन करणाऱ्या शाळांच्या बाबतीत करावयाची कारवाई**

सदर शासन निर्णयाद्वारे दिलेल्या कार्यपद्धतीचे व या संदर्भात मंडळाने दिलेल्या सुचनांचे उल्लंघन करणाऱ्या शाळा/ व्यक्ती/ समिती पालन करणार नाहीत अथवा त्यामध्ये कसूर करतील वा अभिलेखांमध्ये गैरप्रकार करतील, अशा शाळांच्या बाबतीत

१. मंडळ मान्यता , मंडळ सांकेतांक काढून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.
२. निकाल तयार करणाऱ्या प्रक्रियेतील कोणत्याही घटकाने कार्यपद्धतीचे उल्लंघन केल्यास/ दस्तऐवजात फेरफार केल्यास अथवा गैरप्रकार व अनियमितता केल्यास दोषीवर शिस्तभंग विषयक आणि / किंवा आर्थिक दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
३. गैरप्रकार व अनियमितता याचे स्वरूप पाहून सदर शाळेतील विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवणे / रद्द करणे याचा निर्णय मंडळातर्फे घेण्यात येईल.

वरीलपैकी एक किंवा अधिक प्रकारची कारवाई करण्याचे अधिकार संबंधित सक्षम प्राधिकरणास राहतील.

**मंडळाच्या संगणक प्रणालीवर शाळांनी भरलेली माहिती अंतिम समजली जाणे**

विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गुण भरण्यासाठी मंडळामार्फत संगणकीय प्रणाली उपलब्ध करून देण्यात येईल. सदर प्रणालीवर शाळांनी निकाल समितीने अंतिम केलेले विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गुण मंडळाने दिलेल्या मुदतीत भरावेत. शाळांनी सदर गुण अंतिम करून प्रणालीमध्ये सादर केल्यानंतर त्यामध्ये शाळांना कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. त्यामुळे शाळांनी संगणकीय प्रणालीमध्ये माहिती भरण्यापूर्वी योग्य ती खात्री करून व आवश्यक ती दक्षता घेऊनच माहिती भरावी.

**कोणत्याही प्रकारचे मूल्यमापन न झालेले विद्यार्थी (दिव्यांग विद्यार्थ्यांसहीत)**

अपवादात्मक परिस्थितीमध्ये शाळेने आयोजित केलेल्या सराव चाचण्या, प्रथम सत्र, सराव परीक्षा अथवा इतर अंतर्गत मूल्यमापनासाठी एखादा विद्यार्थी उपस्थित नसेल तर अशा विद्यार्थ्याबाबत शाळांनी ऑनलाइन, दूरध्वनीद्वारे वा तत्सम प्रक्रियेद्वारे एकास एक पद्धतीने वस्तुनिष्ठ मूल्यमापन करावे व आवश्यक नोंदी करून गुणदान करावे.

**श्रेणी विषयांचे मूल्यमापन**

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी श्रेणी विषयांचे अंतर्गत मूल्यमापन मंडळाच्या प्रचलित पध्दतीनुसार पूर्ण करून विषयनिहाय श्रेणी मंडळातर्फे देण्यात आलेल्या संगणक प्रणालीत नोंदवावी.

## गुणपडताळणी / उत्तरपत्रिकांची छायांकित प्रती मिळणे / पुनर्मूल्यांकन

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा सन २०२१ चा निकाल माध्यमिक शाळास्तरावर शाळांकडून उपरोक्त नमूद केलेल्या विविध मूल्यांकन प्रक्रियेद्वारे तयार करण्यात येत असल्याने तसेच अंतर्गत मूल्यमापनासाठी ग्राह्य धरलेल्या प्रथम सत्र परीक्षा / सराव परीक्षा / अन्य मूल्यमापन इ. परीक्षांच्या उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना दाखविल्या / घरी दिल्या जात असल्याने गुणपडताळणी,उत्तरपत्रिकांची छायांकित प्रती मिळणे, पुनर्मूल्यांकन या सुविधा सदर परीक्षेसाठी कोणत्याही स्तरावर उपलब्ध नसतील.

## कार्यवाहीचे वेळापत्रक

सदर धोरणानुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा सन २०२१ साठी विद्यार्थ्यांची मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण करण्याचे सविस्तर वेळापत्रक राज्य मंडळामार्फत जाहीर करण्यात येईल.

## शाळांना सहाय्य

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा सन २०२१ मूल्यमापन प्रक्रिया शाळा स्तरावर गठीत निकाल समितीच्या मार्फत राबविण्यासाठी खालील प्रमाणे सहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

१. सदर मूल्यमापन प्रक्रियेची माहिती शाळांना देण्यासाठी वेबिनारचे आयोजन करण्यात येईल.
२. सदर मूल्यमापन प्रक्रीयेसंदर्भात सतत विचारले जाणारे प्रश्न व उत्तरे (FAQ) https://mahahsscboard.in/ अपलोड करण्यात येतील
३. उपरोक्त मूल्यमापन प्रक्रियेतील विद्यार्थी बैठक क्रमांकनिहाय व विषयनिहाय गुण नोंदविण्यासाठी संगणकीय प्रणाली शाळांना मंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच याबाबत सविस्तर सूचना मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील.
४. विभागस्तरावर विभागीय मंडळाचे अधिकारी व जिल्हास्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी या मूल्यमापन धोरणाच्या संदर्भात आवश्यक मार्गदर्शन करण्यासाठी उपलब्ध राहतील, त्यासाठी स्वतंत्र हेल्पलाईन उपलब्ध करून देण्यात येईल याची माहिती https://mahahsscboard.in/ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा २०२१ चा अंतिम निकाल उपरोक्त नमूद मूल्यमापन प्रक्रियेच्या आधारे शाळास्तरावर गठीत निकाल समितीने परीक्षण व नियमन केलेल्या व मंडळाच्या संगणक प्रणालीत नोंदविलेल्या गुणांच्या आधारे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यामार्फत अंतिम करण्यात येईल. सदर निकालप्रक्रियेत शासनाच्या व मंडळाच्या धोरणानुसार व तरतुदीनुसार देय असलेल्या अन्य गुणांचा लाभ प्रचलित पद्धतीनुसार देय राहील व उत्तीर्णतेचे अन्य निकष लागू राहतील.सदर निकालाच्या आधारे मंडळामार्फत गुणपत्रक व प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२१०५२८१४१९२९२७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA SHANKARRAO PAWAR

Digitally signed by RAJENDRA SHANKARRAO PAWAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SCHOOL EDUCATION & SPORT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, serialNumber=01d5ac9d227fcf738d4d5a366976c83175db4f058411807fb1031c17dd155677, cn=RAJENDRA SHANKARRAO PAWAR
Date: 2021.05.28 14:25:52 +05'30'

**( राजेंद्र पवार )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
३. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
४. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
६. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
७. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. सर्व विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
९. सर्व विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
१०.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
११.प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सर्व
१२. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद.